MSBSHS-11/44/2026-PDB-12TH-A

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे ४११००५

Maharashtra State Board Of Secondary &
HIGHER SECONDARY EDUCATION PUNE 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /
25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL sscboardpune@gmail.com

जा.क्र.पुविमं/उमा-अ/ 410
पुणे ४११ ००५
दिनांक 19 /०१/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर व सोलापुर

विषय- फेब्रु/मार्च २०२६ इ. १२ वी प्रमाणपत्र परीक्षा प्रवेशपत्रांबाबत..
संदर्भ- राज्य मंडळ पत्र जा.क्र.रा.मं/परीक्षा-७/९३ दि ०९.०१.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च २०२६ इ. १२ वी प्रमाणपत्र परीक्षेतील प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) सोमवार दि.१२.०१.२०२६ पासून www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध झालेली आहेत.

त्याकरीता फोटो सदोष असल्यास किंवा विद्यार्थ्याकडून प्रवेशपत्र गहाळ झाल्यास इ.बाबतच्या सर्व सूचना सोबतच्या राज्य मंडळ पत्र जा.क्र.रा.मं/परीक्षा-७/९३ दि ०९.०१.२०२६ यामध्ये दिलेल्या आहेत.

त्यामुळे सोबतच्या राज्य मंडळ पत्राचे व्यवस्थित अवलोकन करुन विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.

सोबत-राज्य मंडळ पत्र जा.क्र.रा.मं/परीक्षा-७/९३ दि ०९.०१.२०२६

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 17-01-2026
14:23:54

(डॉ. मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव (प्र.),
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५



e:\vandana more\vandana more\e-office 2025.docx

| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आधारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४ | |
|---|---|---|---|

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/८३
पुणे - ४११ ००४
दिनांक - ०९/०१/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत....

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन(Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर सोमवार दि. १२ जानेवारी, २०२६ पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरिता उपलब्ध होतील.

१ फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२ प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
३ ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
४ अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No. विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५ Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "Correction Admit Card " या Link व्दारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६ ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late Paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७ प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८ प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेशपत्र download करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधणेकरीता सूचित करावे व विभागीय मंडळांनी व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी पुढील कार्यवाहीसाठी संपर्क साधावा. No Candidate केलेल्या परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संबधित विद्यार्थ्यांना वितरीत करू नयेत अशी स्पष्ट सूचना संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांना आपल्या स्तरावरून देण्यात यावी.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच विद्यार्थी यांना सदर बाब अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी-

व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे-०४.